ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १९ फेब्रुवारी, १९५८ | अंक ८

## विविध माहिती

**गणिती महिलेचा दौरा**—मोठमोठीं अवघड गणितें कांहीं क्षणांतच सोडवून दाखविणारी प्रसिद्ध महिला कु. शकुंतला देवी ही लवकरच पूर्वेकडील देशांच्या दौऱ्यावर जाणार आहे. पाश्चात्य राष्ट्रांतील आपल्या दौऱ्यांत तिनें आपल्या बुद्धीनें तज्ज्ञांसहि चकित केलें होतें. एका प्रसंगीं तर आंकडेमोड करणारा विजेचा मेंदु चुकला, पण तिचें उत्तर बरोबर आलें.

**मध्यप्रदेशांतील सहकारी संस्था**—मध्य प्रदेश सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राज्यांत ८५० सहकारी शेतीच्या संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. सर्व संस्था मिळून सुमारें ४२,००० खेडीं ह्या योजनेंत समाविष्ट होतील. राज्यांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**चामड्या-कातड्यांच्या धंद्याचें प्रदर्शन**—कलकत्ता येथें कातड्याच्या धंद्याविषयींचें दुसरें अखिल भारतीय प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनांत, कमावलेल्या कातड्याच्या धंद्यासंबंधींच्या विविध वस्तू ठेवण्यांत आल्या आहेत. भारताच्या निरनिराळ्या भागांतील ५२ संबंधित धंदेवाल्यांनीं प्रदर्शनांत भाग घेतला आहे.

**अमेरिकन शास्त्रज्ञांचा इषारा**—अमेरिकेनें आपलें शेतकी-विषयक तंत्र जर जगांतील इतर देशांना शिकविलें नाहीं तर आणखी १०० वर्षांनीं जगांत अन्नाचा भयंकर तुटवडा पडेल असा इषारा एका अमेरिकन शास्त्रज्ञानें दिला आहे. त्याच्या मतानें ह्या कालावधींत जगांतील लोकसंख्या ३॥ पटीनें वाढून ९०० कोटींच्या घरांत जाईल. सध्यां ती २५० कोटी आहे.

**निझाम साखर कारखाना**—निझाम साखर कारखान्याची उत्पादनक्षमता २५ टक्क्यांनीं वाढविण्याचा विचार करण्यांत येत आहे. सध्यां ह्या कारखान्यांत रोज ३,००० टन ऊंस गाळण्यांत येतो. आणखी १,००० टन ऊंस रोज गाळण्याची यंत्रसामुग्री आयात करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. पण यंत्रसामुग्रीसाठी द्यावें लागणारें परदेशीय चलन मिळविण्यांत अडचणी येत आहेत.

**भारतासाठी जपानी रेल्वे-एंजिनें?**— जपानमधील एका कारखान्यानें भारतामधील रेल्वेसाठीं एक विजेचें एंजिन तयार केलें आहे. हिंदी तज्ज्ञांनीं जपानच्या एंजिनाबद्दल शंका व्यक्त केल्यामुळें कारखान्यानें तें एंजिन चालवून पाहण्यासाठी मोफतहि देण्याची तयारी दाखविली. ह्याच प्रकारच्या ब्रिटिश एंजिनापेक्षा तें बरेच स्वस्त आहे.

**बागायतदारांना मदत**—आंध्र प्रदेश सरकारनें राज्यांतील फळांचें उत्पादन वाढविण्याचा जो कार्यक्रम आखला आहे त्याला मदत म्हणून मध्यवर्ती सरकारनें ४·५ लाख रुपये मंजूर केले आहेत. ह्यापैकी ३ लाख रुपये बागायतदारांनीं नव्या बागा लावाव्या म्हणून त्यांना उत्तेजन देण्यासाठी आहेत. बाकीची रक्कम जुन्या बागांतील उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नासाठी आहे.

**कच्छमध्यें सर्वोदय केंद्र**—कच्छमधील मांडवी तालुक्यांत एका सर्वोदय केंद्राची स्थापना करण्यांत आली आहे. ह्या केंद्रांत एक शाळा, एक प्रसूतिगृह, एक दवाखाना व एक समाजहित मंडळ ह्यांची सोय करण्यांत आली आहे. केंद्राच्या स्थापनेसाठी एका स्थानिक व्यापारानें जरूर त्या रकमेची देणगी दिली आहे.

**स्वस्त रेडिओ सेट्स करा**—भारताचे माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री श्री. केसकर ह्यांनीं रेडिओच्या उत्पादकांना अशी विनंती केली आहे कीं त्यांनीं स्वस्त किंमतीचे रेडिओ सेट्स तयार करावे. असे सेट्स तयार करण्यांत आले तर उत्पादकांचा नफा कमी न होता तो वाढेल. कारण, अधिक रेडिओ खपतील असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

**पूर्व जर्मनीला कॉफीचा पुरवठा**—कॉफीबोर्डानें चालू वर्षीं पूर्व जर्मनीला २,००० टन कॉफी निर्यात करण्याचें ठरविलें आहे. कॉफीच्या पिकाला लागणारीं पोटॅश व रॉक फॉस्पेट हीं खतें मिळविण्यासाठी वरील निर्यात करण्यांत येणार आहे. हीं खतें मिळणें कठीण झालें आहे. ह्या व्यवहारांतील किंमत रुपयांत देण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## नुकसान-भरपाई बाँडस्

निरनिराळ्या जमीनधारा पद्धति रद्द करण्यासंबंधीचे कायदे व त्याखालील नियम यांमधील तरतुदींनुसार जे नुकसानभरपाईचे बाँड द्यावयाचे आहेत, ते मुंबई येथील रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या पब्लिक डेट ऑफिसमधून दिले जातील व नंतर कलेक्टर ते संबंधित इसमाच्या हवाली करतील. या बाँडवर दरसाल ३ टक्के दरानें व्याज देण्यांत येईल आणि मुद्दलाची रक्कम व त्यावरील व्याज हें दरसाल सारख्या हप्त्यांनीं मुंबई राज्यांतील ट्रेझऱ्या व सबट्रेझऱ्यांमध्यें मिळेल.

बाँडस् मिळाल्यावर संबंधित इसमांनीं ते ठरलेल्या हप्त्याचे पैसे मिळण्यासाठी ट्रेझऱ्या किंवा सबट्रेझऱ्यांत दाखल करावे असा त्यांना सल्ला देण्यांत येत आहे. दरवर्षी ठराविक तारखेस किंवा त्या तारखेनंतर एकाच ट्रेझरींत हे बाँडस् हप्ता मिळण्यासाठी सादर करावेत. शेवटचा हप्ता मिळेपर्यंत त्याच ट्रेझरींत ते सादर करावे. त्याबरोबर ठराविक फॉर्ममधील पावतीहि सादर करावी.

प्रत्येक हप्त्याच्या वेळीं दिली जाणारी मुद्दलाची व व्याजाची रक्कम आणि उरलेलें मुद्दल यांची नोंद दरसाल बाँडवर केली जाईल. मुद्दल व व्याज यांचा हप्ता मिळण्याची मुदत मरल्याबरोबर हप्ता घेतला पाहिजे. हप्त्याची संपूर्ण रक्कम घ्यावी लागेल; ट्रेझऱ्यांकडून थोडी थोडी रक्कम दिली जाणार नाहीं.

## वनस्पती तुपाचा धंदा

भारतांतील वनस्पती तुपाच्या उत्पादनाइतकें उत्पन्न आशियांत दुसऱ्या कोणत्याहि देशांत होत नाहीं; आणि जगांत भारताचा पांचवा अनुक्रम लागतो. २५ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें, १५,००० लोकांना काम देणारे, ५ लक्ष टनांची उत्पादनक्षमता असणारे ५२ कारखाने आज मध्यवर्ती सरकारला एक्साइज पट्टीच्या रूपानें दरसाल ६ कोटी रुपये देत आहेत. पाश्चात्य देशांत मार्गरिनला जें स्थान आहे, तेंच भारतांत वनस्पतीला आहे. १९५१-५२ व १९५५-५६ चे ह्या संबंधांतील आंकडे व पंचवार्षिक योजनेचें लक्ष्य खाली आढळेल:—

| | १९५१-५२ | १९५५-५६ | १९६०-६१ |
|---|---|---|---|
| कारखान्यांची संख्या | ४८ | ४८ | ५८ |
| उत्पादनशक्ति (टन) | ३,३३,००० | ४,१२,१०० | ४,४६,००० |
| उत्पादन (टन) | १,८०,२२० | २,९०,००० | ४,००,००० |
| निर्गत (टन) | ३,०६० | १२,९८९ | २५,००० |
| भारतांतील खप (टन) | १,७७,१६० | २,६२,७०१ | ३,८०,००० |

निर्गत होणाऱ्या वनस्पतीवर एक्साइज ड्यूटी माफ केली जाते. निर्गतीवर कर घेतला जात नाहीं. वनस्पतीची निर्गत मुख्यतः प. आशिया, बर्मा, पाकिस्तान, ग्रेट ब्रिटन, एडन, ऑस्ट्रेलिया, मलाया, सिंगापूर व फिजी बेटें ह्यांकडे होते.


श्री. वा. काळे ह्यांच्या कौटुंबिक पुस्तकांचे गुजराती अनुवाद.

' सस्तु साहित्य एटले उंचामां उंचुं साहित्य '

☞ સદાચારને પગલે અથવા શિષ્ટાચાર ☜

' पुढे पाऊल ' ह्या दुसऱ्या पुस्तकाचा प्रा. शशिन ओझाकृत अनुवाद, विक्रीस तयार.

पृ. सं. १३७ ] ★ [ किंमत रु. १·२५

☞ સુખી જીવનની પગદંડી ☜

' कण आणि क्षण ' च्या प्रा. ओझाकृत अनुवादाची दुसरी आवृत्ति.

पृ. सं. १६८ ] ★ [ किंमत रु. १·५०

सस्तु साहित्यवर्धक कार्यालय, अहमदाबाद.

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०

खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००

उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १¾% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १९ फेब्रुवारी, १९५८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ग्राहकांच्या मागणीचें मूल्यमापन

कापडाच्या ग्राहकांच्या मागणीचें मूल्यमापन करणारी भारतामधील पहिली तपासणी अहमदाबादमधील कापड-धंदा संशोधन-संघटनेनें केली आहे. ह्या तपासणींत ग्राहकांच्या मागणीविषयीं बाहेर आलेली माहिती उद्बोधक आहे. अहमदाबाद शहरांतील ८३ टक्के नागरीक आणि अहमदाबाद जिल्ह्यांतील ७० टक्के नागरीक हातमागाच्या कापडापेक्षा व खादीपेक्षा गिरणीच्या कापडालाच पसंति देतात असें आढळून आलें आहे. वृत्तपत्रांतील जाहिरातींवर विसंबून फक्त एक टक्का गिऱ्हाइकें आपलें कापड पसंत करतात. प्रत्येक पांच ग्राहकांपैकी तीन ग्राहक कापडाच्या चांगुलपणाबद्दल दुकानदाराचा शब्द प्रमाण मानतात. ह्या नमुन्याच्या तपासणींत अहमदाबाद शहरांतील ७०० घरांचा समावेश करण्यांत आला होता. त्याशिवाय आणखी दोन प्रमुख शहरांतील २०० घरांतूनहि पसंती-नापसंतीबद्दल तपासणी करण्यांत आली होती. जिल्ह्यांतील ग्राहकांची आवड-निवड अजमावण्यासाठी २० खेडेगांवांतील ३०० घरांची निवड करण्यांत आली होती. संशोधकांनीं जी माहिती गोळा केली ती भारत सरकारकडे व नियोजन-समितीकडे पाठविण्यांत आली आहे. कापडाच्या पसंतीबाबत ग्राहक पुढील गुणांना त्यांच्या अनुक्रमानें महत्त्व देतात असें दिसून आलें. पोत, किंमत, गिरणीचें नांव, टिकाऊपणा, रंग, डिझाइन, धुण्याची सुलभता आणि आकर्षकता. अहमदाबाद शहरांतील कापडाची विक्री बहुधा ठोक व किरकोळ व्यापाऱ्यांमार्फत वायद्याच्या पद्धतीनें होत असते. फारच थोड्या गिरण्या थेट ग्राहकांना आपला माल विकतात. त्यामुळें कापडाच्या गिऱ्हाइकांच्या आवडीनावडीविषयींची माहिती त्यांना प्रत्यक्ष न मिळतां विक्रेत्या दलालामार्फतच घ्यावी लागते.

---

## भारत–अमेरिकेंत ऐनजिनसी बदल्याचा करार ?

भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान एक ऐनजिनसी बदल्याचा करार होण्याचा संभव आहे. भारताच्या बाजूनें सुमारें ३·५ कोटी डॉलर्स किंमतीच्या महत्त्वाच्या वस्तू पुरविण्यांत येण्याची शक्यता असल्यामुळें करारांतील आर्थिक व्यवहार बऱ्याच मोठ्या स्वरूपाचा होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. अमेरिकेंत शेतीचा बराच माल शिल्लक असल्यानें त्याची विल्हेवाट त्या सरकारला लावावी लागते. संकल्पित कराराप्रमाणें अमेरिका भारताला सुमारें ५,००,००० टन गहूं पुरविणार आहे त्याशिवाय पडून असलेला आणखी कांहीं शेतीचा मालहि भारताला देण्यांत येईल. अमेरिकेला कांहीं महत्त्वाच्या युद्धोपयोगी मालाचे सांठे करून ठेवावयाचे आहेत. त्यासाठीं ह्या कराराची कल्पना निघाली आहे असें म्हणतात. तथापि, अमेरिकेला शेतीच्या मालाच्या बदला कोणत्या वस्तू पाहिजेत ह्यासंबंधीं अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. बेरिलचें खनिज, मँगेनीज, अभ्रक, क्रोम, ह्या वस्तूंची अमेरिकेला सामान्यपणें गरज असते. पण ह्या वस्तू अशा आहेत कीं, त्यांच्या निर्यातीनें भारताला डॉलर्सची प्राप्ति सहज होऊं शकतें. अर्थातच, ह्या वस्तूंचा समावेश ऐनजिनसी बदल्याच्या करारांत करण्यास भारतांत फारशी उत्सुकता दिसून येत नाहीं. पण, अमेरिकेला नेमक्या ह्याच वस्तू पाहिजे आहेत. भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान आर्थिक मदतीचा जो करार होऊं घातला आहे त्या संबंधींच्या तपशीलावर वाटाघाटी सध्यां अमेरिकेंत चालू आहेत. ह्या मोठ्या कराराचा एक भाग म्हणूनच ऐनजिनसी बदल्याचा करार करण्यांत येण्याचा संभव आहे. मोठ्या कराराप्रमाणें भारताला अमेरिकेकडून २२·५ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळेल. बदल्याचा करार झाला तर उभयतां देशांतील अशा प्रकारचा तो पहिलाच करार होईल.

---

## पाकिस्तान निर्नियंत्रण करणार ?

पाकिस्तान सरकारनें रोज खपाच्या अनेक वस्तूंवर असणारीं नियंत्रणें रद्द करण्याचा विचार चालविला आहे असें समजतें. त्याचप्रमाणें कांहीं औषधांवरील नियंत्रणेंहि रद्द करण्यांत येणार असल्याची वार्ता आहे. फक्त तांदूळ, गहूं आणि साखर ह्या पदार्थांवरील नियंत्रणें मात्र सध्यांप्रमाणेंच चालूं ठेवण्यांत येणार आहेत. ह्या प्रश्नासंबंधीं पाकिस्तानच्या मंत्रिमंडळाच्या बैठकींत नुकतीच चर्चा करण्यांत आली. सध्यां पाकिस्तानांत बऱ्याच वस्तूंवर किंमतीसंबंधींचीं नियंत्रणें जारी आहेत; आणि कांहीं थोड्या वस्तूंच्या बाबतींत किंमतीप्रमाणेंच वांटपाच्या बाबतींतहि नियंत्रणें अमलांत आहेत. औषधें, मोटारगाड्या, रेडिओ सेट्स, शीतपेट्या, टायर्स व ट्यूब्ज, लोखंड व पोलाद, विजेचीं उपकरणीं, कृत्रिम रेशीम, मालवाहू मोटारी, यांत्रिक नांगर, इत्यादि अनेक वस्तूंवर दोन्ही प्रकारचीं नियंत्रणें आहेत. पाकिस्तानला परदेशीय हुंडणावळींची चणचण भासूं लागतांच ह्या वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घालण्यांत आले. परिणामीं, त्या काळ्या बाजारांत गडप झाल्या आणि सरकारला नियंत्रणें बसवावीं लागलीं. निर्नियंत्रणाची तपशीलवार योजना अद्याप आखण्यांत आलेली नाहीं. कांहीं तज्ज्ञ असें सुचवीत आहेत कीं कांहीं वस्तूंवरील नियंत्रणें काढून घेण्यांत यावींत आणि त्याचा बाजारवर काय परिणाम होतो तो अजमावण्यांत यावा. नियंत्रणें रद्द करण्यांत आलेल्या वस्तूंच्या किंमती जर स्थिर राहिल्या तर दुसऱ्या कांहीं वस्तूंवरील नियंत्रणेंहि रद्द करण्यांत यावींत. अशी सावधगिरी बाळगून हळूहळू नियंत्रणें काढून घेण्यांत येण्याचा संभव आहे. तथापि, ह्याचा अर्थ सरकार परदेशी मालाची आयात अनिर्बंध होऊं देईल असें मात्र नाहीं.

---

## अल्पबचतींचा आटता झरा ?

१९५७–५८ मध्यें अल्प बचतींच्या मार्गें १२० कोटी रुपये जमा व्हावेत अशी अपेक्षा होती. परंतु, ऑक्टोबर, १९५७ अखेरच्या पहिल्या सहामाहींत फक्त २२ कोटी रुपयेच जमा झाले आहेत. १९५६–५७ च्या पहिल्या सहामाहींत ३४ कोटी रुपये जमा झाले होते.

## किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी

वरील कंपनीनें ३१ जुलै, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी ८४ लक्ष रुपयांची विक्री केली. म्हणजे, त्यापूर्वीच्या वर्षीपेक्षा १४३/४ लक्ष रुपयांनीं विक्री अधिक झाली. म्हैसूर किर्लोस्कर लि. चे मॅनेजिंग एजंट म्हणून किर्लोस्कर ब्रदर्स लि. ला ३३,५५१ रु. मिळाले. किर्लोस्कर सन्स आणि कंपनीच्या, किर्लोस्कर इलेक्ट्रिक व किर्लोस्कर ऑइल एंजिन्स कंपन्यांच्या मॅनेजिंग एजन्सी कमिशनमधील वाट्याचे ८४,७४७ रु. मिळाले. कंपन्यांतील शेअर भांडवलाच्या गुंतवणुकीवर ८४,७४७ रु. डिव्हिडंड आलें. सर्व खर्च भागवून, ६,०१,३४७ रु. घसारा काढून, सर्व करांसाठी ६,३१,५८९ रु. ची तरतूद करून ४,३९,७६१ रु. निव्वळ नफा उरला. लक्ष्मणराव किर्लोस्कर स्मारकाची योजना चारहि किर्लोस्कर कंपन्यांनीं मिळून आखली आहे, तिला ७५,००० रु. चीं देणगी देण्यांत येणार आहे. भागीदारांना ८% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी १,८१,५३२ रु. चा विनियोग करण्यांत आला.

### कंपनीचा ताळेबंद : प्रमुख आंकडे

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २२,९७,०१८ | जमीन, इमारती, यंत्रसामुग्री | ३३,१७,१९४ |
| जनरल व इतर रिझर्व्हज् | ७६,०४,८६७ | इन्व्हेस्टमेंटस् | ११,१७,०९१ |
| तारणावरील कर्जें | १,६५,६९२ | स्टोअर्स, स्पेअर-पार्टस्, स्टॉक, चालू उत्पादन, | |
| तारण नसलेलीं कर्जें | १२,४२,४१७ | किरकोळयेणेकरी | ७८,०३,९९८ |
| चालू देणीं व तरतुदी | २६,९५,८०० | येणीं | १२,६१,१५६ |
| | | रोख बँकांत | ५,७०,२७१ |
| एकूण | १,४०,६९,७१० | एकूण | १,४०,६९,७१० |

## दि किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि., हरिहर

(मॅनेजिंग एजंटस : मेसर्स किर्लोस्कर असोसिएट्स्)

किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनीला आतां ११ वर्षे पुरीं झालीं आहेत. इलेक्ट्रिक मोटर्स, ट्रॅन्सफॉर्मर्स, स्विचगिअर्स, अल्टरनेटर्स, इत्यादींच्या उत्पादनांत कंपनीनें उत्कृष्ट प्रगति केली आहे. नोव्हेंबर, १९४९ मध्यें कंपनीच्या कारखान्यांत उत्पादन होऊं लागलें. दरमहा १०० मोटर्स तयार करण्याचें प्रारंभीं ध्येय होतें; आतां दरमहा १,५०० मोटर्स बनविण्यांत येत आहेत. त्यांत १५ अश्वशक्तीपासून २५० अश्वशक्तीच्या मोटर्स आहेत. १९५१ मध्यें ट्रॅन्सफॉर्मर्सच्या उत्पादनास प्रारंभ झाला; तें आतां दरमहा १५,००० केव्हीए इतकें होत आहे. भारतांतील एकूण इलेक्ट्रिकल उत्पादनांपैकीं ही एकटी कंपनी ३०% उत्पादन करते.

३० जून, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीला २२·७५ लक्ष रु. ठोक नफा झाला. त्यापूर्वीच्या वर्षी तो १६·५६ लक्ष रु. होता. १९५४–५५ मध्यें तो ७·७३ लक्ष रु. होता. निव्वळ नफा गेल्या वर्षी ६·९४ लक्ष रुपये उरला. पूर्वीच्या वर्षी डिव्हिडंडचा दर ५१/२% होता, तो आतां ७१/२% करण्यांत आला आहे. १९५५-५६ चे मानानें १९५६-५७ मध्यें विक्रीचें उत्पन्न ५७·५% वाढलें; १०६ लक्ष रुपयांवरून तें १६७ लक्ष रुपयांवर गेलें. कंपनीच्या उत्पादनवाढीच्या कार्यक्रमास आणखी भांडवल लागेल, त्याकरितां डायरेक्टरांनीं ५ लक्ष रुपयांचे आणखी भाग विक्रीस काढण्याचें योजिलें आहे.

## समाजवादी रिझर्व्ह बँक ?

ऑल इंडिया रिझर्व्ह बँक एम्प्लॉईज असोसिएशनच्या वार्षिक सभेचे अध्यक्षस्थानावरून डॉ. ग्यानचंद ह्या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञानें व्यक्त केलेले विचार "असोसिएशनचे अध्यक्ष" ह्या त्यांच्या भूमिकेला साजेसे असले, तरी किती व्यवहार्य आहेत ह्याबद्दल शंका वाटते. रिझर्व्ह बँकेच्या कार्यांत व कारभारांत आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली त्याचें कारण म्हणजे आपल्या देशांत समाजवादी रचनेचें ध्येय पुढें ठेवण्यांत आलें आहे, हें होय ! त्या बँकेच्या व्यवस्थापक-मंडळावर बँक नोकरांचे प्रतिनिधी असावेत, ही त्यांची सूचना अगदींच कांहीं नवी नाहीं; कांहीं उद्योगधंद्यांतून कामगारांना कांहीं प्रमाणांत व्यवस्थेंत सहभागी करण्यांत आलें आहे, हें खरें आहे. पण तें तत्त्व रिझर्व्ह बँकेंत लागू करणें कितपत योग्य ठरेल, ह्याचा नीट विचार व्हायला पाहिजे. रिझर्व्ह बँकेंतील वेतनमान इतर तत्सम संस्थांच्या मानें ज्यास्तच आहे; अर्थात् कांहीं किरकोळ अंतर्गत तक्रारी असणें अगदीं शक्य आहे. आजहि, शेतीला कर्ज पुरवठ्याच्या कामीं रिझर्व्ह बँक विशेष मदत देत आहे; गरजू उत्पादकांकडे तिचें अधिकाधिक लक्ष जात आहे. रिझर्व्ह बँकेचा उद्देश, तिचें कार्य, इत्यादि गोष्टी जोंपर्यंत बदललेल्या नाहींत तोंवर तिच्यांत समाजवादी फरक सुचविण्यांत, आणि तोहि रिझर्व्ह बँक–नोकरांच्या असोसिएशनच्या अर्थशास्त्रज्ञ अध्यक्षानें, कांहीं अर्थ नाहीं. डॉ. ग्यानचंद ह्यांच्या सूचनेचें महत्त्व त्यांच्या विशिष्ट भूमिकेमुळें नाहींसें झालें आहे.

### जपानकडून भारताला मिळालेलें कर्ज

भारताला जपानकडून १,८०० कोटी येनचें कर्ज मिळालें आहे. अमेरिकेकडून भारताला मिळणारें ३० कोटी डॉलर्सचें कर्ज, मुंबई व मद्रास बंदरांची सुधारणा करण्यासाठी जागतिक बँकेकडून मिळणारें कर्ज, त्याचप्रमाणें फ्रान्स व पश्चिम जर्मनीकडून मिळणाऱ्या उशिरां किंमत देण्याच्या सवलती, ह्या सर्वांमुळें भारताची परदेशी चलनविषयक परिस्थिति कांहींशी सुधारली आहे. तथापि, अखेर हीं सर्व कर्जेंच असून देशाच्या भविष्यकालावर ती दडपणासारखी ठरण्याचा संभव असतो. औद्योगिक भांडवली मालाच्या किंमती आजच द्याव्या न लागल्या तरी पांच–दहा वर्षांनीं तरी द्याव्याच लागतील. म्हणून ह्या कर्जाचा फायदा घेऊन देशांतील उत्पादन वाढवून निर्यात वाढविणें हाच एक उपाय आर्थिक परिस्थिति काबूंत ठेवण्याचा असतो. ह्या दृष्टीनें जपाननें भारताशीं केलेली व्यापारी सोयरीक महत्त्वाची आहे. कारण, कर्जाच्या व्यवहाराबरोबरच उभयपक्षांनीं एकमेकांशीं सवलतीच्या धोरणावर आधारलेला व्यापार करण्याचाहि करार केलेला आहे. एका दृष्टीनें असा व्यापारी करार आवश्यकहि होता. कारण, १९५४ पासून भारताच्या जपानशीं होत असलेल्या व्यापारांत भारत जपानकडून निर्यातीपेक्षा अधिक माल आयात करीत होता. ही परिस्थिति अशीच चालू राहिली असती तर भारताला आयातीवर बंधनें घालावीं लागलीं असतीं. पण आतां जपानकडून कर्ज मिळाल्यामुळें भारताला त्याचा उपयोग करून आयात चालू ठेवतां येईल. कर्जाचा फायदा घेऊन भारतानें जपानकडून भांडवली स्वरूपाचा माल आयात केला आणि त्याचबरोबर व्यापारी करारप्रमाणें आपली जपानला होणारी निर्यात वाढविली तर ते उभयपक्षीं हिताचें होणार आहे. व्यापारी करारांत बऱ्याच प्रकारच्या शेतीच्या मालाचा व खनिजांचा उल्लेख करण्यांत आला आहे. ह्या मालाची जपानला गरज आहे.

## रेल्वेचा अर्थसंकल्प

( कोटी रुपये )

| | १९५६–५७ प्रत्यक्ष खर्च | १९५७–५८ चा दुरुस्त अंदाज | १९५८–५९ अंदाज |
|---|---|---|---|
| वाहतुकीचें एकूण उत्पन्न | ३४७·५७ | ३८४·४० | ४०७·४८ |
| सर्वसाधारण चालू खर्च | २३३·९४ | २५९·१६ | २६८·३५ |
| निव्वळ संकीर्ण खर्च | ९·९२ | १४·०१ | १६·९९ |
| घसारा राखीव निधींत जमा | ४५·०० | ४५·०० | ४५·०० |
| वर्क्ड लाईन्ससाठीं खर्च | ००·३३ | ००·३३ | ००·२२ |
| निव्वळ रेल्वे महसूल | ५८·३८ | ६५·९० | ७६·९२ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा | ३८·१६ | ४४·२४ | ४९·५८ |
| निव्वळ शिल्लक | २०·२२ | २१·६६ | २७·३४ |

### साखर कारखान्याची देशी यंत्रसामुग्री

साखरेच्या धंद्याच्या वाढीसाठी नेमण्यांत आलेल्या कौंसिलची आठवी बैठक अध्यक्ष श्री. टी. सी. पुरी ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. ह्या प्रसंगीं भाषण करतांना श्री. पुरी म्हणाले कीं, साखरेच्या उत्पादनाची वाढ करण्यासाठी जे नवे कारखाने काढण्यांत यावयाचे आहेत त्यांच्या स्थापनेच्या मार्गांत गेल्या कांहीं दिवसांत परदेशीय हुंडणावळीच्या चणचणीमुळें अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळें साखरेच्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री देशांतच उत्पन्न करण्याचे प्रयत्न आवश्यक झाले आहेत. देशांत तयार केलेली यंत्रसामुग्री परदेशांत तयार झालेल्या यंत्रसामुग्रीपेक्षा कमी प्रतीची असते हें खरें आहे. पण तरीसुद्धां आपल्या गरजा भागविण्यासाठी नेहमींच बाहेरील पुरवठ्यावर अवलंबून राहणें योग्य होणार नाहीं. सध्यां अशा प्रकारच्या यंत्रसामुग्रीच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यांत येत आहे. त्यामुळें देशांतील साखरेच्या कारखान्याच्या यंत्रसामुग्रीचें उत्पादन वाढत आहे. १९५७ च्या पहिल्या सहामाहींत देशांत साखरेची ४० लाख रुपये किंमतीची यंत्रसामुग्री तयार झाली. १९५५ सालीं १९ लाख रुपयांची व १९५६ सालीं ३२ लाख रुपयांची यंत्रसामुग्री तयार करण्यांत आली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत साखरेच्या उत्पादनाची वाढ करण्यासाठी जितक्या कारखान्यांना परवाने देण्यांत यावयाचे होते तितके आतां देऊन झाले आहेत. त्यामुळें ह्यापुढील परवाने जे कारखाने आर्थिकदृष्ट्या लहान व म्हणून नुकसानींत असतील त्यांनाच देण्यांत येतील. अर्थात् दुसऱ्या कार्यक्रमांत ठरल्याप्रमाणें सहकारी कारखान्यांनाहि तें शक्य असेल तर देण्यांत येतील.

**बलसाडचा पाणी-पुरवठा**—सुरत जिल्ह्यांतील बलसाड शहराला पाणीपुरवठा करण्याची योजना मुंबई सरकारनें गेल्या वर्षीं हातीं घेतली होती. सदर योजनेस २२·५० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. योजनेसाठीं लागणाऱ्या खर्चापैकी निम्मा खर्च सरकार देणार आहे. योजनेचें काम बरेंच प्रगत झालें असून तें पुढील वर्षाच्या मध्यापर्यंत पूर्ण होईल.

**सूर्यप्रकाशापासून वीज**—रशियन शास्त्रज्ञांनीं सूर्यप्रकाशाच्या शक्तीचें रूपांतर करणारी विजेरी शोधून काढली आहे. विजेरींत आलेल्या सूर्यप्रकाशाच्या शक्तीपैकी ८ ते १० टक्के शक्तीचें रूपांतर होऊं शकतें. ह्या विजेच्या साह्यानें एखाद्या रेडिओसाठी पुरेल इतकी अगर बऱ्याच शास्त्रीय उपकरणांना पुरेल इतकी वीज तयार होऊं शकते.

## श्री. वा. काळे ह्यांचें दुसरें गुजराती पुस्तक

### गुजराती साहित्यिक श्री. सोपान ह्यांचे हस्तें प्रकाशन

श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या "कण आणि क्षण" ह्या पुस्तकाचा गुजराती अनुवाद अतिशय लोकप्रिय झाला आहे. त्या अनुवादाच्या मागोमाग "पुढें पाऊल"चेंहि गुजराती भाषांतर आतां प्रसिद्ध झालें आहे. अहमदाबाद येथील सुप्रसिद्ध सस्तु साहित्यवर्धक कार्यालयानें प्रा. शशिन् ओझा ह्यांचेकडून करविलेल्या ह्या अनुवादाचा प्रकाशन–समारंभ श्री. मोहनलाल महेता–सोपान ( संपादक, "जीवन–माधुरी" व "जन्मभूमि" ) ह्यांच्या हस्तें शनिवार दि. १५ रोजीं झाला. त्यावेळीं श्री. विठ्ठलराव घाटे व प्रा. श्री. बा. रानडे ह्यांचीं श्री. काळे ह्यांच्या पुस्तकासंबंधीं गुणदर्शक भाषणें झालीं. अध्यक्ष, श्री. सोपान, आपल्या भाषणांत म्हणाले, "मी स्वतः नवलकथाकार आहे. पण श्री. काळे ह्यांच्या पुस्तकानें माझें चित्त इतकें आकर्षित झालें, कीं त्या पुस्तकाचें गुजराती भाषांतर झालेंच पाहिजे असें माझ्या मनानें घेतलें. सस्तु साहित्यवर्धक कार्यालयानें तें प्रसिद्ध केलें नसतें, तर मी स्वतः तें प्रसिद्ध केलें असतें. श्री. काळे ह्यांनीं अत्यंत शैलीनें कौटुंबिक प्रश्नांचें विवेचन केलें आहे." सौ. संजीवनीबाई मराठे ह्यांनीं औचित्यपूर्ण गीतांची निवड करून, त्यांचें गायन केलें. त्यामुळें समारंभाच्या सांस्कृतिक वातावरणांत उत्कृष्ट भर पडली.

### समारंभाला आलेले कांहीं संदेश

"चोपडी घणी सुंदर अने जीवनमां उपयोगी छे. आवी जनतानां हितवर्धकरूप पुस्तक लखवा माटे तमने हार्दिक अभिनंदन"

देवकरण नानजीनो बंगला, वाळकेश्वर, मुंबई. } जयावती प्राणलाल

"आजच्या ह्या समारंभाच्या सुमंगल प्रसंगीं हिंदी अनुवादाचें काम लवकर उरकण्याची प्रेरणा मला लाभत आहे. समाज–कल्याणाच्या उद्घोषांत आपली सरस्वती सदैव, सोल्हास, पुढेंपुढें प्रवाहत असावी, हींच प्रभुचरणीं नित्याची प्रार्थना आहे."

महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति, पुणें } पं. मु. डांगरे

"समाजाला वळण तुमच्या लेखांनीं मिळत आहे. कायद्याला न करतां येण्याजोग्या गोष्टी तुमचे लेख करीत आहेत."

"रामराज्य" पुणें २. } ग. र. तुळशीबागवाले

"आपल्या वाङ्मयीन कन्यांना आपण आपल्या देशांतील चौदाहि साड्या नेसवाव्या, अशी शुभेच्छा प्रकट करितो."

"लताकुंज" बेळगांव } गो. वि. सराफ

"मी मोठ्या आग्रहानें म्हणते, कीं आपल्या लेखनाची पुढच्या पिढीला फार जरूरी आहे. तेव्हां जास्तींत जास्त लेखनाची आणखी भर घालावी, अशी मी आपणांस विनंती करते."

घाटे ब्लॉक्स, पुणें ४ } सुशीलाबाई आपटे

"आपल्या पुस्तकांचा अनुवाद भारतीय भाषांतच नव्हे, तर इतर अनेक भाषांत केल्यास नवी संस्कृति वाढण्यास मदत होईल."

सिंद्री, विहार } का. श्रि. पाटील

## हिंदी औद्योगिक उत्पादनांत वाढ

भारत सरकारच्या उद्योग खात्याच्या आकड्यांप्रमाणें, भारताचें औद्योगिक उत्पादन गेल्या दहा वर्षांत ६०% वाढलें आहे. १९५० = १०० ह्या इंडेक्सप्रमाणें औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स नंबर १९५२ मध्यें १०३.६, १९५३ मध्यें १०५.६, १९५४ मध्यें ११२.९, १९५५ मध्यें १२२.१ व १९५६ मध्यें १३३.० असा झाला.

| | १९४७ मधील उत्पादन | १९५७ मधील उत्पादन |
|---|---|---|
| टेक्स्टाइल्स | ३,७६ कोटी वार | ५,५० कोटी वार |
| वनस्पति | ९५,००० टन | ३२०,००० टन |
| साखर | १०,७५ लक्ष टन | २०.१ लक्ष टन |
| मीठ | १९ " " | ५७ " " |
| सल्फ्यूरिक ॲसिड | ६०,००० टन | १६५,००० टन |
| रेडिओ | ३,००० नग | १५०,००० नग |
| शिवण्याचीं यंत्रें | ६,००० नग | १६६,००० नग |
| सायकली | ४९,००० नग | ६९५,००० नग |
| मोटारी | शून्य | ३५,००० नग |
| डीझेल इंजनें | ७०० नग | १८,००० नग |
| विजेचे पंखे | १६०,००० नग | ४८६,००० नग |
| कोळसा | ३ कोटी टन | ४.४ कोटी टन |
| पोलाद | ८.५ लक्ष टन | १३.४ लक्ष टन |
| सिमेंट | १४ लक्ष टन | ६१ लक्ष टन |

### पोलादाचें उत्पादन

| | ( ००० टन ) |
|---|---|
| १९५२ | १.१०३ |
| १९५३ | १,०२३ |
| १९५४ | १,२४३ |
| १९५५ | १,२६० |
| १९५६ | १,३३८ |

### आयात करावें लागणारें लोखंड व पोलाद

| वर्ष | सरकारी आयात (०००' टन) | खासगी आयात (०००' टन) | एकूण (०००' टन) |
|---|---|---|---|
| १९५२ | ११ | १८६ | १९७ |
| १९५३ | ७९ | १६९ | २४८ |
| १९५४ | ५७ | ३३० | ३८७ |
| १९५५ | १९६ | ७०५ | ९०१ |
| १९५६ | ७४७ | १,१०० | १,८४७ |

### बँकांचें एकत्रीकरण

दि कोट्टायम आणि ओरिअंट सेंट्रल ह्या केरळमधील बँकांचें एकत्रीकरण झालें; त्यांचें अनुकरण आतां कोचिन कमर्शिअल व मद्रास सिटी ह्या बँका करणार आहेत. ह्या नियोजित एकत्रीकरणाचा उद्देश, दोन्हींतून मिळून एक शेड्यूल्ड बँक निर्माण व्हावी, असा आहे. त्रावणकोर–कोचिन बँकिंग चौकशी कमिशननें केरळमधील बँकांचा सूक्ष्म अभ्यास करून एकत्रीकरणाचा उपाय सुचविला होता. बँकांचें स्वरूप मोठ्या आकाराचें असावें, असें वारें सर्वत्र वाहूं लागलें आहे. बँक–नोकरांना त्यामुळें जास्त पगार मिळणें शक्य होतें.


दैनंदिन खर्चातील काटकसरीतून
अधिक बचत करण्यासाठी आमच्या
होम सेव्हींग सेफ
बचत योजनेचा फायदा घ्या.
सविस्तर माहिती मुख्य कचेरींत अगर
कोणत्याही शाखा कचेरींत मिळेल.
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगाव, मुंबई ४.


टेलिफोन: २७०९४
स्थापना १९१८
शाखा: फोर्ट · दादर · माहिम · वरळी · पुणें · बेळगांव.



प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर-मुंबई.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: –श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

## सातारा जिल्हा को–ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., कराड

### रजिस्ट्रार, डॉ. शेख, ह्यांच्या भेटीच्या वेळीं चेअरमन, श्री. नी. आ. कल्याणी, ह्यांनीं केलेलें निवेदन

### (२)

आतांपर्यंत या बँकेकडून ३१–१२–५७ अखेर १७९१ सभासदांना २५,४६,७०० रुपयांचें कर्ज वाटलेलें आहे. त्यापैकी ११७४ सभासदांना १४,३२,५५० रुपयांचें कर्ज जुनें कर्ज भागविणेस,२८५ सभासदांना ३,६५,८०० रुपयांचें कर्ज नवीन विहीर काढणेस, विहीर दुरुस्ती, जमीन सुधारणा, ताली इत्यादि करितां दिलेलें आहे. १२८ शेतकऱ्यांना ३,४४,६५० रुपये कर्ज एंजिन, पंप, चरक, ट्रॅक्टर इत्यादि खरेदीकरितां दिलें असून २०४ लोकांना ४,०३,७०० रुपयांचें कर्ज जमीन खरेदीकरितां दिलेलें आहे. डिसेंबर अखेर सभासदांकडे येणें १७,०१,५७३ रुपयांचें असून मुंबई बँकेचें कर्ज १५,८८,५५५ रुपयांचें आहे. तसेंच बँकेचें शेअर भांडवल १,२४,५८० रुपयांचें असून बँकेचा रिझर्व्ह फंड, बिल्डिंग फंड इत्यादि ४१,००० रुपयांचा झालेला आहे. १९५५–५६ सालीं या बँकेस १६,४२५ रुपये फायदा झालेला असून गेल्या सालअखेरीस १५,९०५ रुपये फायदा झालेला आहे, व त्यांतून पावणेचार टक्के आणि चार टक्के प्रमाणें डिव्हिडंडहि जाहीर करणेंत आलें आहे. सुरवातीचीं २ वर्षे सोडल्यास बँकेचा ऑडिट–वर्गहि अ आहे. त्याचप्रमाणें या बँकेनें मुंबई लँड मॉर्गेज बँकेचा हप्ता वेळच्या वेळीं दिलेला असून गेल्या २२ वर्षांत बँकेची कधींच थकबाकी झालेली नाहीं हें येथें नमूद करावेंसें वाटतें.

### स्वतंत्र अधिकाऱ्यांची आवश्यकता

लँड मॉर्गेज बँकेकरितां एक स्वतंत्र अधिकारी व कांहीं नोकरवर्ग सरकारकडून मिळावा अशी आमची विनंती आहे. त्या बाबतींत आजपर्यंत अनेक लँड मॉर्गेज बँकांनीं व कार्यकर्त्यांकडून वेळोंवेळीं मागणी करणेंत आलेली आहे. तसेंच रिझर्व्ह बँकेनें देखील अशा प्रकारें शिफारसहि केली आहे. आतां लँड मॉर्गेज बँकांचा व्यवहार दीड कोटींवर गेलेला आहे. तेव्हां असा एक स्वतंत्र अधिकारी असणें आणखीन जास्त जरूरीचें आहे. यामुळें व्यवहार तर वाढणारच आहेत, त्याचबरोबर नसतील तेथें जिल्हा बँका-शाखा काढण्यास, वरिष्ठ बँकेचे व जिल्हा बँकांचे संबंध सुधारणेस, थकबाकीचे वसुलीस, वगैरे अनेक प्रकारच्या अनेक अडचणींतून मार्गदर्शन होण्यास सुलभ होईल.

### मध्यम मुदतीचें कर्जवांटप

या बँकेमार्फत नवीन विहीर काढणेस, जुन्या दुरुस्ती करणेस, जमीन सुधारणेस, एंजिनादि भारी किंमतीची यंत्रसामुग्री खरेदी करणेस वगैरे अनेक शेतीच्या कामांकरितां कर्ज दिलें जातें. पण याच कामाकरितां असलेलें मध्यम मुदतीचें कर्जवांटप या बँकेकडे न देतांना तें मुंबई स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक व सेंट्रल बँकांकडे सोंपविणेंत आलेलें आहे. अल्प मुदतीचें कर्ज व मध्यम मुदतीचें कर्ज हें तर अवघ्या दीड टक्क्यानें या बँकांना मिळूं शकतें. अशा तऱ्हेच्या सवलती लँड मॉर्गेज बँकांना नाहींत अगर व्याजाचे दरहि इतके कमी नाहींत. फक्त सरकारकडून मंजूर झालेल्या चार ते सव्वाचार टक्क्यांचें डिबेंचर्स रिझर्व्ह बँकेकडून कांहीं प्रमाणांत घेतलें जातात. तेव्हां लँड मॉर्गेज बँकांकडेच मध्यम मुदतीचें कर्ज सोंपविणें योग्य दिसेल. नाहींपेक्षा लांब मुदतीच्या व्यवहारास यामुळें धोका निर्माण होणार आहे. कदाचित् थकलेले अल्प मुदतीच्या कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जांत रूपांतर होणेचा बराच संभव आहे. अल्प मुदतीचें अगर मध्यम मुदतीचें कर्ज लवकर मिळतें ही एक समजूत आहे. लँड मॉर्गेज बँकांकडून देखील जरूर ती सर्व माहिती मिळाल्यास त्यांच्याकडून देखील दोन तीन महिन्यांतच हा व्यवहार पुरा होऊं शकतो.

### सरकारनें शेअर्स घ्यावेत

सहकारी बँकांच्या शेअर भांडवलांत वाढ होणेच्या दृष्टीनें ज्या त्या संस्थांचे शेअर्स सरकारकडून खरीदले जाण्याची तरतूद दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें केली आहे. या बँकेचें शेअर भांडवल व रिझर्व्ह फंड इत्यादि मिळून १,६०,६९४ रुपये आहे. परंतु, पोटनियमाप्रमाणें कर्जाचे प्रमाणांत मुंबई बँकेचे शेअर्स खरेदी करावे लागल्यानें या बँकेस भांडवलाची अत्यंत गरज असते. तात्पुरतें कर्ज देण्यास खेळत्या भांडवलाची अत्यंत नड आहे. याशिवाय बाँबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेकडून पूर्वीपासून सर्वच सेंट्रल बँकांचे शेअर्स खरेदी करून त्यांची पत वाढविण्यांत येते व वेळोंवेळीं त्यांना त्यांच्या कामकाजांत मदत करण्यांत येते. परंतु, मुंबई लँड मॉर्गेज बँकेकडून मात्र अशा प्रकारें कांहींच केलें जात नाहीं. तेव्हां या महत्त्वाचे प्रश्नाचा गंभीरपणें विचार होऊन सरकारकडून निदान या बँकेचे अडीच लाख रुपयांचे शेअर्स घेणेंत यावेत. त्याचप्रमाणें मुंबई बँकेनेंहि या बँकेच्या शेअर भांडवलांत सहभागीदार होऊन कामास प्रोत्साहन मिळणेस मदत करावी.

### व्याजांतील मार्जिनांत वाढ हवी

सुरुवातीचे प्रचार, अर्ज दाखल करून घेण्यापासून तें थेट कर्ज फेडून दस्तऐवजाची भरपाई करून देणेपर्यंत प्रत्येक काम जिल्हा बँकेस करावें लागतें. मात्र डिबेंचर्सवरील व्याज व प्रत्यक्ष सभासदास आकारलें जाणारे व्याजाचे दरांत तीन टक्क्यांचें अंतर आहे. म्हणजे मुंबई बँकेस दीड टक्क्यांचें मार्जिन असून या बँकेस दीड टक्क्यावरच रहावें लागतें. यामुळें जरूरीप्रमाणें नोकरवर्गांत वाढ करतां येत नाहीं. २२ वर्षे झालीं तरी स्वतःच्या इमारतीची योजनाहि आंखतां येत नाहीं. या व अशा प्रकारच्या अनेक आर्थिक अडचणी आहेत. तेव्हां जिल्हा बँकांना २ टक्क्यांचें मार्जिन ठेवून वरिष्ठ बँकेस १ टक्क्याचें मार्जिन ठेवण्यांत यावें. उदा. मुंबई स्टेट बँक व सेंट्रल बँक अगर सेंट्रल बँक व सोसायटी यांमध्यें देखील हेंच अगर किंबहुना यापेक्षा जास्त प्रमाण असतें. तेव्हां त्याप्रमाणें आपल्याहि वरिष्ठ बँकेनें धोरण ठेवण्यास हरकत नाहीं असें मला वाटतें.

---

### शंकराचार्यांचा अमेरिकेंत दौरा

पुरी विद्यापीठाचे शंकराचार्य गेल्या आठवड्यांत न्यूयॉर्कला पोंचले. अमेरिकेंत ते दोन महिने दौरा करणार आहेत.


### OUR PUBLICATIONS

1. Banks—Yesterday, Today and Tomorrow, (1952).
2. Bankers' Annual Number, (1953).
3. Banking in Maharashtra (1954).
4. Banking in Maharashtra and adjoining Region. (1957).

THE DECCAN BOOK ASSOCIATION.
THE POONA BANKERS ASSOCIATION.

## तेल गाळण्याच्या धंद्याचा सहकारी तत्त्वावर विकास

उत्पादकांच्या हिताचा विचार करून सरकारचें तेल काढण्याच्या धंद्याचा विकास केवळ सहकारी तत्त्वावर करण्यासाठी योजना तयार करण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. गळितधान्यें गाळण्याच्या धंद्याच्या चौकशी-समितीनें केलेल्या शिफारशींवर सरकारनें घेतलेला हा एक निर्णय आहे. देशांत सर्वत्र खेड्यांतील तेल्यांच्या सहकारी संस्थांचें जाळें असणें इष्ट ठरेल असें मत सरकारनें व्यक्त केलें आहे. अशा संस्था तेल्यांची बरीच वस्ती असलेल्या खेड्यांत वा खेड्यांच्या सुटसुटीत गटांत स्थापन करतां येऊं शकतील. कापणीनंतर पिकांच्या किंमती फारशा वाढलेल्या नसतात. अशा वेळीं गळितधान्यें सांठवून ठेवून तेल्यांना त्यांचा सतत पुरवठा करीत राहणें हें अशा सहकारी संस्थांचें एक प्रमुख कार्य राहील. या सहकारी संस्थांनीं, सदस्यांनीं तयार केलेलें तेल आणि पेंड खरेदी करून तो माल सहकारी विक्री-संस्थांकडे अगर मध्यवर्ती आणि राज्यांच्या गुदाम कॉर्पोरेशनच्या गुदामांकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. स्वतंत्र सहकारी संस्था स्थापन होऊं शकत नसलेल्या विभागांतील तेल्यांना सहकारी संस्थांचे सदस्य करून घेण्यांत यावें आणि मोठ्या पतपेढ्यांच्या गुदामांतून त्यांना लागणाऱ्या गळित धान्यांचा पुरवठा व्हावा. विक्री सहकारी संस्थांनाहि अशा प्रकारच्या सवलती याव्यात. राज्य सरकारांनीं सहकारी संस्थांना गुदामे बांधण्यासाठी कर्जाची तरतूद करून त्यांना येणाऱ्या अडचणी दूर कराव्यांत अशीहि शिफारस करण्यांत आलेली आहे. तसेंच सहकारी संस्थांचे शेअर घेण्यासाठींहि तेल्यांना साह्य देण्यांत यावें. प्रतिवर्षी आर्थिक साह्य देऊन तेल्यांना सुधारलेल्या १० हजार घाणींचा पुरवठा करण्यांत यावा ही आणखी एक शिफारस सरकारनें स्वीकारलेली आहे. प्रत्येक घाणीकरितां पूर्वीप्रमाणें १५० रुपये साह्य मिळेल. भारतीय मध्यवर्ती गळितधान्य समितीनें इतर किरकोळ गळितधान्यांच्या उत्पादनासंबंधींची आंकडेवारी गोळा करून ती प्रकाशित करण्याच्या प्रश्नांचाहि विचार करावा, असें मत व्यक्त करण्यांत आलें.

---

**अणुशक्तीवर चालणारी विमानवाहू बोट**—अणुशक्तीवर चालणाऱ्या विमानवाहू बोटीच्या बांधणीस अमेरिकेनें प्रारंभ केला आहे. १९६१ मध्यें बोट बांधून तयार होईल आणि तीसाठी ३१·४ कोटी डॉलर्स खर्च येईल. आठ अणुभट्ट्यांच्या साह्यानें ती चालविण्यांत येईल. एकदां जळण घेतल्यावर २ वर्षें ती एकसारखा प्रवास करूं शकेल.

**हिंदी डॉक्टराचें ब्रिटनमध्यें निधन**—ब्रिटनमध्यें एका गांवीं स्थायिक झालेले डॉ. चौधरी हे नुकतेंच हृदयविकारानें मरण पावले. त्यांनीं आपल्या व्यावसायिक निष्ठेमुळें रोग्यांत फार लोकप्रियता संपादन केली होती. त्याच्या शवाला अग्नि देण्यापूर्वी बऱ्या झालेल्या शेंकडों रोग्यांनीं त्यांच्या शस्त्रक्रियेच्या दवाखान्यांत जाऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**विजेच्या नव्या आगगाड्या**—उपनगरांतील वहातुकीसाठी भारतानें स्वित्झरलंडकडून १६ विजेच्या आगगाड्या मागविल्या होत्या. त्यांपैकी पहिली गाडी लवकरच भारतांत येईल. ह्या गाड्या हलक्या पोलादाच्या बांधण्यांत आल्या असून त्यांतून एकावेळीं १,००० प्रवासी जाऊं शकतील. बहुधा त्या कलकत्ता उपनगर रेल्वेवर वापरण्यांत येतील.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

**—शेड्यूल्ड बँक—**

व्याजाच्या दरांत १% चा फरक म्हणजे १०,००० रुपयांवर १०० रु. होतात. हे शंभर रुपये तुम्हांला आणखी ३ ते ४ रुपये मिळवून देतात.

आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवी मागणीसरशीं परत केल्या जातात. पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

२½% दरानें व्याज दिलें जातें.

बँकेंत तुम्ही तासनतास वाऱ्या घालवूं इच्छित नाहीं.

दक्षतेच्या कारभारासाठी आणि तुमच्या गुंतवणुकीवर अधिक व्याज मिळविण्यासाठी बँकांच्या खालील कचेऱ्यांत चौकशी करा :—

(१) ४५५, रविवार पेठ, पुणें २.
(२) ५४, डे. जि. कॉलनी, पुणें ४.
(३) ३६१, सदाशिव पेठ, पुणें २.
(४) वखार भाग, सांगली.



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

**[ शेड्यूल्ड बँक ]**

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी.

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | १-८-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.